# सुगंधी वास

ॲड. अरूण गोविंद देशमुख



हा नाही आभास...खून होतोच...आल्यास वास...
थरकापणारी खुनांचा मागोवा घेणाऱ्या इन्स्पेक्टर अश्विनीची कहाणी...
सुगंधी वास...

## प्रकरण एक - प्रदिप-अश्विनी

'हँड्स अप!'

त्या करारी आवाजाने प्रदिप जागीच थबकला. मागे वळत त्याने त्या आवाजाच्या दिशेने पाहिले. आवाजाची जरबच अशी होती की, भल्याभल्यांच्या पाचावर धारणच बसावी. आपण पूर्णपणे वेढलो गेलेलो आहोत ह्या धारणेनेच आहे त्या जागीच त्याने स्वत:ला रोखण्याचा प्रयत्न केला. एक दोन पावले इकडे तिकडे झाली व त्याने मागे कटाक्ष टाकला. जसे जसे त्याने त्या इन्स्पेक्टरचे तेजस्वी रुप पाहिले त्याचे हात अभावितरित्या आकाशाकडे गेले. नायगाव-परळच्या गल्लीबोळातून पळवलेल्या या इन्स्पेक्टरला आपण नक्कीच चकमा देऊ असे त्याला वाटले होते. आपण अशा तऱ्हेने हिच्या तावडीत सापडू ह्याची सुतराम शक्यता त्याला वाटलेली नव्हती. त्यामुळे स्वत:च तो आश्चर्यचकित होता.

प्रदिप जकातदार उर्फ पिजे हा परळच्या महर्षी दयानंद महाविद्यालयात विज्ञान शाखेत शेवटच्या वर्षाला होता. महर्षी दयानंद महाविद्यालय हे परळमधील तसे नावाजलेले असे गोरगरिबांचे महाविद्यालय होते. मध्यमवर्गीय व कामगार

कामगार वस्तीतील मुलांमुलींची संख्या इथे अधिक असायची. खास करून खेळाच्या व एन.सी.सी.च्या मोहापायी चांगल्या महाविद्यालयातील प्रवेश टाळून प्रदिपने महर्षी दयानंद महाविद्यालय शिक्षणासाठी निवडले होते. तसा तो महाविद्यालयात पूर्णपणे रुळलेला होता. बहुतांशी विद्यार्थी व विद्यार्थिनींचा तो लाडका होता.

सर्वांमध्ये मिसळणारा प्रदिप हा कोणाच्यातही सहज मिक्स व्हायचा. तो खुश असला की गालातल्या गालात मंद हसतच जायचा आणि हातातल्या चाव्या आपल्या तर्जनीत गोल गोल फिरवत बसायचा. त्याचा हा हसरा चेहराच सगळ्यांना आपलंसं करत असायचा. त्याचा चेहरा हसरा असला तरी त्याच्या चेहऱ्यामागे असणारा करारीपणा सहज दिसायचा. स्वत: एन.सी.सी. मध्ये असल्याने असावे; पण त्याच्या आवाजात एकप्रकारचा रुबाबदारपणा होता. आवाजही खणखणीत होता. दिसायला गोरा, तेजपुंज काया, उंची ५ फूट १० इंच आणि भरदार शरीर. त्याचे डोळे बोलके होते आणि बघायला गेलं तर तो कॉलेजचा चॉकलेटी हिरोच होता. एन.सी.सी.मुळे त्याच्या डोक्यावरचे केस सदानकदा मिलिटरी कटचे असत आणि चेहऱ्यावर रुबाबदार छोटी मिशी, त्यामुळे तो एन.सी.सी.त असो किंवा बाजूने जात असो; सर्वजण अनाहुतपणे त्याला पहातच रहायचे.

प्रदिपने ११वी ते १३वी एन.सी.सी. करून नाव कमवलेले होते. दिल्लीच्या रिपब्लिक डे म्हणजेच आर. डी. परेडमध्ये त्याने महर्षी दयानंद महाविद्यालयातून फोर महाराष्ट्र बटालीयनचे प्रतिनिधीत्व करून नाव कमावलेलं होतं. आर. डी परेडमध्ये सुद्धा महाराष्ट्राच्या मुलांचा तो गळ्यातला ताईत होता. मल्लखांबाची प्रात्यक्षिके असो, व्हॉली-बॉलचे गेम असोत किंवा धावण्याची शर्यत असो, प्रत्येक ठिकाणी गुण मिळवण्यासाठी त्यांच्या ग्रुपचा तो जसा हुकमी एक्का होता. तशी महर्षी दयानंदच्या एन.सी.सी. मधून आर.डी. परेडसाठी फ़ारच कमी मुलं निवडली जायची. इतक्या वर्षात त्यांची संख्या बोटावर मोजण्याएवढी नगण्यच होती. त्यामुळे प्रदिपची निवड ही कॉलेजच्या एन.सी.सी. साठी खास महत्वाची बाब होती. परत कुठल्याही कार्यक्रमासाठी पठ्ठ्या स्वत:च्या खिशात हात घालून खर्च करायला कधीच मागेपुढे पहायचा नाही आणि हो...कोणालाही मदत केली तरी तो त्याच्याकडून पैसे परत घ्यायचा नाही किंवा भांडण झाले तरी केलेली मदत ऐकवून दाखवायचा नाही. खास करून त्याला सिनीअर अंडर ऑफिसर व्हायचे होते, म्हणून प्रदिपने १३वी व

१४वी मध्ये सी ग्रेडची परीक्षाच दिलेली नव्हती. त्यामुळे १५वीत तो सिनीअर अंडर ऑफिसर झाला होता. त्यामुळे त्याच्या चालण्या-बोलण्यात करारीपणा आला होता. जन्म:जात नायक असणाऱ्या त्याच्यातील या गुणांमुळेच त्याच्याबद्दल नुसत्या एन.सी.सी. च्या मुलामुलींमध्येच नाहीतर समस्त कॉलेजमध्ये एक वेगळा आदर व दरारा होता.

प्रदिप जकातदार हा जकातदार अ‍ॅण्ड कंपनीचा आजच्या घडीचा मालक होता. त्याच्या वडिलांनी त्यांच्यामागे एक जबरदस्त एम्पायर उभे करून ठेवलेलं होतं. इंग्लंडला जाताना त्याच्या वडिलांना त्याला घेऊन लंडनला जायचं होतं; मात्र दहावीचे पेपर फुटल्याने पोराचे तीन पेपर पुढे गेल्याचं कारण झालं आणि प्रदिपला न घेता रमेश जकातदार आणि त्यांची बायको प्रिया जकातदार हे विमानाने पुढे गेले. गेले कसले ते कायमचेच गेले न परत येण्याइतक्या लांब. कारण इंग्लंडला त्यांच्या गाडीचा महाभयानक असा अपघात झाला. त्यांच्या गाडीला समोरून येणाऱ्या डम्परने वेगाने येऊन ठोकले होते. त्यांच्या गाडीचा ड्रायव्हर, रमेश जकातदार आणि त्यांची बायको प्रिया जकातदार हे जागीच ठार झाले. लंडनच्या पोलीसांनी त्यांच्या लंडनच्या कार्यालयाकडून त्यांच्या नातेवाईकांना संपर्क साधला होता.

प्रदिपच्या काकांना, श्रीरंग जकातदार यांना तर धक्काच बसला होता. आपल्या सोन्यासारख्या भावाचा आणि प्रेमळ वहिनीचा असा अकस्मात मृत्यू होईल हे त्यांनीही स्वप्नात पाहिले नव्हते. तातडीने विमानाने लंडन गाठून त्यांनी संपूर्ण यंत्रणा कामी लावत त्या दोघांचेही शव विमानाने भारतात आणले होते. या संपूर्ण काळात त्यांनी प्रदिपच्या मामांना म्हणजेच अ‍ॅड. राम देशपांडे यांची मदत घेतली. त्यांनी त्यांना प्रदिपकडे धाडले होते. सर्वांनाच त्यांनी तंबी देत किमान प्रदिपचा आजचा पेपर पूर्ण होईपर्यंत त्याला काहीही सांगायचे नाही हे नक्की केले. घरातील रामूकाका यालाही सुगावा लागू न दिल्याने प्रदिपने नेहमीप्रमाणे त्या दिवशीचा पेपर दिला. प्रसंग बाका होता, त्यामुळे शुक्रवारी जो पेपर होता तो संपला की त्याला थेट स्मशानात आणायचे ह्याची जबाबदारी मामांवर टाकली आणि खरंच श्रीरंग जकातदार यांनी प्रदिपचा पेपर संपेस्तोवर त्याला त्याचा सुगावा लागू दिला नव्हता. मात्र पेपर संपला आणि जसा तो बाहेर आला तो, त्याला बाहेरच त्याचा मामा न्यायला उभा होता. प्रदिपला सरप्राईज दिलं असं दाखवत आपले दु:ख लपवत त्यांनी त्याला आपल्या गाडीतून काहीही न सांगता स्मशानभूमीत आणले.

प्रदिपला मामाने थेट स्मशानभूमीत का आणलं ते कळलंच नाही. मात्र गाडीतून उतरल्यावर आपल्या कंपनीतील सर्व कर्मचारी पाहून प्रदिपचे काळीज चरकले. मामांनी आपला भार त्याच्या खांद्यावर टाकून मोकळा केला आणि प्रदिपच्या कानात एकच बाब ऐकू गेली.

'तुझ्या आई-बाबांचा लंडनला अ‍ॅक्सीडंट झाला आणि दोघेही जागेवरच गेले रे! माझी पियू गेली रे, आता कोणाचे लाड करू मी?'

श्रीरंगने प्रदिपला बाजूला घेत संपूर्ण माहिती दिली होती. दोघांचीही अवस्था दर्शन घेण्यापलीकडे असल्याची माहिती त्यांनी देताच प्रदिपला हुंदका आवरता येईना. काकांनी त्याला धीर देत विचारलं,

'आई-वडिलांना अग्नी देशील ना?'

आणि प्रदिपने मानेनंच हो म्हणताच दोघेही एकमेकांच्या खांद्यावर मान टाकून रडले होते. मग स्वत:ला सावरून एकाच वेळेस आई-बाबांच्या पार्थिवांना प्रदिपने अग्नी दिला. आई वडिलांच्या पार्थिवांना अग्नी देताना प्रदिप आतून जाम कोसळला होता. त्याच्या काकांनी आणि मामांनी त्याला धीर दिला होता.

खरं सांगायचं तर प्रदिपने मामांना सावरले. मामांचे म्हणजेच अ‍ॅड. राम देशपांडे यांचे आपल्या बहिणीवर खूप प्रेम होते. प्रियाचे लहानपणापासून सर्व लाड त्यांनी पुरवले होते. प्रियाचे रमेश बरोबर जुळलेले प्रेम त्यांनी मानले. प्रिया जकातदार ही त्यांची सख्खी व लाडाची बहिण होती. अ‍ॅड. राम देशपांडे हे परळ व्हिलेज मध्ये रहायचे. मामा दोघांचाही लाडका असल्याने स्थिर झाल्यावर प्रदिपच्या वडिलांनी परळच्याच अशोका गार्डन मध्ये २०११ साली अवघ्या ३२,००० स्के. फुट भावाने ३ बीएचकेचा आलिशान फ्लॅट विकत घेतला. पूर्वी सर्वचजण गिरगावात एकत्र रहात होते. गिरगावच्या जागी त्यांनी श्रीरंग भावाला ठेवत ते स्वत:, प्रिया, प्रदिप आणि रामूकाका ही सर्व अशोका गार्डन्स इथे रहायला आली होती. आपल्या वकिल मित्राच्या जवळचा फ्लॅट त्याने मुद्दामहून निवडला होता. रमेशचे प्रियाशी लग्न झाल्यावर चढत्या क्रमाने धंद्यातील प्रगती पाहून अ‍ॅड. रामला त्याच्या मित्राचा म्हणजेच रमेशचाही सार्थ अभिमान वाटत असायचा. प्रदिपला मामांच्या मनातील ते प्रेम, तो अभिमान वेळोवेळी अनुभवायला मिळत होता.

एके दिवशी प्रदिपच्या बाबांनी त्याला सांगितलं,

'मी आणि श्रीरंगकाकाने इच्छापत्र केलं आहे, कळलं का?'

प्रदिपने अनाहूतपणे विचारलं होतं, ‘इतक्या लवकर? माझे बाबा पार म्हातारे होऊन मगच जाणार आहेत. मग इतक्या लवकर का करतोस रे इच्छापत्र?’

रमेश जकातदारांनी त्याला समजावलं.

‘बी प्रॅक्टिकल प्रदिप. होऊ नये पण समजा ज्या विमानाने मी प्रवास करतो आहे त्याला अपघात झाला तर माझी संपत्ती नक्की कुठे आहे हे तरी त्यामुळे तुम्हाला कळेल! नाहीतर तुला माहिती आहे का? आपली इस्टेट कुठे कुठे आहे ते?’

प्रदिपने मानेने नकार दिला.

‘पण बाबा, खरंच का इच्छापत्र बनवणं जरुरीचं होतं?’

प्रदिपच्या डोक्यावर टपली मारत ते म्हणाले,

‘हॅलो, मी करणार आहे नाही म्हणालो. काल मी ते रजिस्टर करून आलेलो आहे. तुझ्या मामांकडे त्याची ओरिजिनल प्रत आहे हे लक्षात ठेव. पुढे वाटलं तर त्यात बदल करता येतोच की. कळलं?’

प्रदिपला खरं तर समजलंच नव्हतं. आपल्या वडिलांनी आणि काकांनी इच्छापत्र तयार करून काय मिळवले. त्याला एका गोष्टीचे हसू आले.

‘हक्काच्या वकिलांकडे म्हणजेच ॲड. राम देशपांडे यांच्याकडे इच्छापत्र केलेलं होतं. म्हणजे मामांनी फुकटचा चांगलाच धंदा केलेला दिसतोय!’

त्याने तसं मामांना ऐकवून दाखवलं. मामा हसत हसत त्याला म्हणाला होता,

‘ऐक, बाबांनी त्यांचा अचानक मृत्यू झाला तर तुझ्या आईच्या नावे आणि जर दोघांचाही मृत्यू झाला तर तुझ्या नावे आणि तुम्हा सर्वांचाच मृत्यू झाला तर तुझ्या काकांच्या नावे इस्टेट त्यांनी लिहून ठेवलेली होती. समजलं?’

दोघांनाही काय माहीत होतं की, अवघ्या १५ दिवसांपूर्वी केलेल्या इच्छापत्राचा उपयोग आपल्याला इतक्या लवकर करावा लागेल म्हणून. ॲड. राम देशपांडे यांना त्यामुळे एकप्रकारचा धक्काच बसला होता.

प्रदिपचे जे दोन पेपर राहिले होते ते त्याने दोन वर्षे दिलेच नाहीत. कारण पण तसंच होतं ना. त्याचा लाडक्या राममामा त्याच्यासाठी १०वीचा फॉर्म भरून आणायचा आणि परीक्षेचा अभ्यास करूनही परीक्षेला जाताना आई-बाबांची आठवण झाली की तो हळवा होत तसाच पलंगावर मुसमुसत झोपून जायचा. बाकी परीक्षा सोडली तर त्याचं एक चांगलं होतं, ते म्हणजे

वडिलांच्या एक एक धंद्याची माहिती तो स्वत:हून घेत होता.

यामुळे झालं एकच की, प्रदिपने वडिलांच्या धंद्यात चांगलीच पकड घेतली होती. मामांनी दोन वर्षे जाऊ दिली. मग चक्क मानसोपचार तज्ज्ञांची त्यानी मदत घ्यायचं ठरवलं. त्यामुळे तिसऱ्या वर्षी मात्र प्रदिपने शांतपणे सर्व दु:ख पचवत १०वीचे उरलेले दोन पेपर दिले. राममामा आणि श्रीरंगकाकांनी दहावीत पास झाला त्यासाठी त्याचे कोण कौतुक केलं होतं. त्या दोघांनी त्याच्या वडिलांनी केलेल्या इच्छापत्रानुसार १८ पूर्ण झाल्या झाल्याच जकातदार कंपनीची सर्व सूत्र त्याच्याकडे दिली होती. तसे श्रीरंगाची बायको कल्पना जकातदार हिची पण मदत होतच होती. जकातदार कंपनीची सूत्रं प्रदिपकडे देईस्तोवर तीच कंपनी एक हाती चालवत होती.

तसा प्रदिप लहानपणापासूनच कंपनीत जाऊन येऊन होता. आता फरक फक्त हा होता की त्याने आता आपल्या हातात कंपनीची सर्व सूत्रं घेतली होती. या संपूर्ण प्रवासात सगळं कुटुंब म्हणून त्याच्या पाठीशी उभे रहात त्याला मदत करत होते.

आज प्रदिप त्याचा विश्वासू नोकर रामू व शेपर्ड जातीची कुत्री रोमा असे तिघेच त्या भल्या मोठ्या फ्लॅटमध्ये रहात होते. प्रदिपला त्याच्या रामूमामाने १०वी नंतर एकसोएक कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याविषयी सुचवले होते. पण त्याला अनावश्यक श्रीमंती दाखवणाऱ्या मुलांचा व मुलींचा तिटकारा असायचा. प्रदिप स्वत: बॉम्बे स्कॉटीशमध्ये शिकलेला असल्याने एकतर बसने जाण्यायेण्याचा जेवढा त्याला तिटकारा होता तेवढाच हायफाय संस्कृतिचा होता. शाळेमध्ये खेळा व्यतिरिक्त तो कशातही रमायचा नाही. त्याला मित्र-मैत्रिणीही जवळपास नव्हतेच. शाळेतून येताना टिळक ब्रिजवर ट्रॅफिक जॅम असला की बाहेर मोकळेपणाने हसणाऱ्या व खेळत बागडत जाणाऱ्या हिंदू कॉलनीच्या शाळेतील मुलामुलींचे त्याला जाम अप्रूप वाटायचे. त्यामुळेच अकरावीसाठी जिथे पाहिजे तिथे ॲडमिशन मिळू शकत असतानाही एम.डी. कॉलेजच्या प्रेमात तो पडलेला. त्यातही त्याच्याकडे असलेली २ वर्षांची गॅप याची कोणीच विचारपूस करणारे ओळखीचे इथे नव्हते, म्हणून त्याने ते कॉलेज निवडले. परत एमडीचे त्याला खास आकर्षण होते ते एन.सी.सी.चे. कॉन्व्हेंट शाळेतून आलेला असल्यामुळे आणि एका कंपनीचा प्रत्यक्ष मालक असल्याने प्रदिपच्या वागण्याबोलण्यात एकप्रकारचा आत्मविश्वास होता. अर्थात सुरुवातीला त्याला मित्र-मैत्रिणी करायला मात्र वेळ लागला. त्याचा एक

हक्काचा ग्रुप साधारणतः १२वी पर्यंत तयार झालेला होता.

प्रदिपसाठी सायन्सला त्याच्या सोबत असणारी सोनिया भगत त्याची ११वी पासूनची पहिली मैत्रिण ठरली. तिचे वडील प्रदिपच्या कंपनीत क्लार्क होते आणि ती पण अभ्यासात हुशार होती. तिच्यासाबत तिचा आशिक दिपक देसाई त्यांच्या ग्रुपमध्ये आपोआप जोडला गेला. दिपक कॉमर्समध्ये होता तर आर्टसमध्ये शिकणारी श्वेता साने ही सोनियाचीच मैत्रिण असल्याने त्यांच्या ग्रुपबरोबर पाठोपाठ जोडली गेली. रमाकांत नाईक उर्फ वड्या तसा कॉलेजचा नसलेला पाचवा गडी. श्वेताचा हा मित्र. श्वेतामुळेच बऱ्याच वेळा त्याला बोलवायची गरज पडायची आणि पठ्ठ्या दोन हात करायला नेहमी यायचाही. सर्व ग्रुप एक ठराविक वेळी साधारणतः सकाळी ११ ते १२ आणि संध्याकाळी ५ ते ६ एकत्र कँटिनमध्ये बसून खूप मस्ती एंजॉय करायचे. प्रदिप अर्थात पिजे हा त्या ग्रुपचा पहिल्यापासूनच लिडर होता. शिक्षणामुळे, पैशामुळे व एकूणच व्यक्तिमत्वामुळे पिजे ग्रुपचा ताईत होता. यांच्या ग्रुपचा काही न सांगता एक दंडकच होता, तो म्हणजे कँटिनमध्ये जे बिल होईल ते फक्त पिजे देणार.

प्रदिपला त्याची महाविद्यालयातील पहिली तीन वर्षे कशी भुर्रर्रकन उडून गेली ते कळलंच नाही. एकतर एन.सी.सी.चा सराव, कॉलेजचा अभ्यास व मित्रमैत्रिणी बरोबरची टवाळकी आणि स्वतः:च्या कंपनीची माहिती घेताना त्याचा संपूर्ण दिवस कधी गायब व्हायचा हे त्यालाही कळत नव्हतं. कंपनीत तर त्याने हळूहळू लक्ष घालायला सुरुवता केलेली होतीच. फक्त त्याला आता आपली विश्वासू माणसं तिथे पेरायची होती.

प्रदिपच्या वडिलांचे रमेश जकातदार यांचे अनेक धंदे होते. मुंबईतील गिरण्या बंद होताना त्यांनी त्यांचे सुटे भाग घेऊन त्यांची गुजरातला कापडाची गिरणी तसेच ठाण्यात आणि भिवंडीत तयार कापडाचे विविध कपडे तयार करणारे कारखाने टाकलेले होते. त्याच कारखान्यांच्या जोरावर लंडनमध्ये त्यांनी कपड्याच्या दुकानांची मालिकाच तयार केलेली. युरोपच्या सहा देशात मिळून सुमारे ३५ दुकानांची साखळी त्यांच्या मालकीची होती. भारतात मात्र फक्त गुजराथ, महाराष्ट्र आणि बंगलोरला त्यांच्या कपड्याची दुकानं होती. स्वतः रमेश शेअर ब्रोकर म्हणून, त्यातही चांगला जम बसवून होते. त्यामुळे विविध कंपन्यांचे नियमित डिव्हिडंड प्रदिपच्या हातात येत होते. रमेशचे कंपनीत अनेक विश्वासू नोकर होते. रमेश नसला तरी सर्व आपापली कामं चोख बजावत. त्यामुळेच असावे, पण त्यांच्या कंपनीला त्यांच्या जाण्याचा आघात तसा

जाणवला नाही आणि तो ते सहज पचवू शकले. उमद्या प्रदिपने स्वत:हून धंद्यात लक्ष घातल्याने कंपनीमध्ये एकप्रकारचा उत्साह होता. प्रदिपचे शिक्षण चालू असल्याने त्याला कमीत कमी त्रास द्यायचा हा कंपनीच्या प्रमुख मंडळींनी स्वत:वरच घातलेला दंडक होता. प्रदिप कंपनीच्या ऑफिसमध्ये ११वी व १२वीत सकाळी १० ते १२ जायचा. नंतर सिनीअरला गेल्यावर सकाळचे कॉलेज झाले की मग पठ्ठ्या कंपनीच्या कामासाठी सकाळी ११ ते १२ तर सायंकाळी ७ ते ९ असा जायला लागला होता.

प्रदिपच्या संपूर्ण कॉलेजच्या प्रवासात त्यांचा ग्रुप तसा जोरातच होता. फार फार तर श्वेता किंवा वड्यामुळे झालेल्या मारामाऱ्या वगळता सर्व काही सुरळीत होतं. मात्र सिनीअरमध्ये आल्यावर सर्वात आधी राजकारणामुळे त्यांच्या ग्रुपमधली शांतता रसातळाला गेलेली होती. सुरुवातीला दिपकने निवडणूक लढण्याचा घेतलेला निर्णय त्यांच्या कौतुकाचा विषय होता. दिपकनेही १३वी मध्ये कॉलेजची निवडणूक सहज जिंकली. मात्र तो उडायचा तो वड्याच्या भाईगिरीवर आणि प्रदिपच्या म्हणजेच पिजेच्या पैशांवर. अर्थात मुलामुलींना त्याने कामे कमी आणि त्यांच्यासमोर दिखावाच जास्त केलेला होता. ग्रुपमधल्या सर्वांनीच त्याला १४वी मध्ये निवडणूक लढवू नकोस म्हणून सुचवले होते. मात्र त्याने हट्टाने निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आणि त्यामुळे अनेक शत्रू निर्माण झाले.

प्रदिपला १४वीचे वर्ष तसे त्रासाचेच गेलेले. या वर्षात त्यांच्या दिपकने कॉलेजची निवडणूक लढवली होती. दिपक नावापुरताच जिंकला. कारण तसे पाहिले तर त्याने ही निवडणूक फारच वाईटरित्या लढवली होती. आरके ह्या अभ्युदय नगरच्या ग्रुपमधला संदिप सावंत याने त्याच्या विरुद्ध निवडणूक लढवली होती. स्थानिक सेनेच्या शाखेत तो उपप्रमुखपदी असल्याने सेनेनेही त्याच्या पाठी जोर लावला होता. धाकदपटशा पासून कार्यकर्ते घरोघरी जाऊन एक एक मत गोळा करत होते. शेवटच्या दोन दिवसात दिपकला लक्षात आले की ही निवडणूक जडच नाही तर हातातून निसटत चालली आहे. म्हणून शेवटी पिजेने ग्रुपची इज्जत पणाला लावल्यानेच पुढच्या वर्षी बिलकूल निवडणूकीला उभा रहायचे नाही ही हे दिपककडून वदवत त्याच्या मागे ताकद लावली. प्रदिपच्या पैशांनी मात्र जादू केली आणि दिपक जिंकला. तोही अवघ्या चार मतांनी जिंकला. त्यानंतर मात्र पुढील दोन महिने त्यांच्या ग्रुपच्या आणि निवडणूक हरलेल्या आरके ह्या अभ्युदय नगरच्या ग्रुपच्या दरम्यान

किमान ४ ते ५ वेळा वेगवेगळ्या कारणांनी हाणामाऱ्या झाल्या. दिपकच्या बाजूने सतत मध्ये पडणाऱ्या वड्याला तर चक्क लालबाग मार्केटमध्ये सशस्त्र हल्ल्याला तोंड यावं लागलं. जेव्हा वड्यावर हल्ला झाला आणि त्याच्या हातावर आणि पायावर पाच वार करण्यात आले तेव्हा गणेश गल्लीतले वड्याचे मित्र सर्वच भिरसटले. सर्वांनी पिक्चरमध्ये दाखवतात तसे टॅक्स्या करुन अभ्युदय कॉलनीत घुसून अनेकांना घराबाहेर काढत बेदम चोपले होते. शेवटी तिथल्या स्थानिक आमदाराला मध्ये पडावे लागले. त्याच्या मध्यस्थीने वातावरणाला शांतता मिळवून दिली. प्रदिपने दिपकला १५ वी मध्ये इलेक्शनला उभा करणार नाही असा सरळसरळ निरोप संदिप सावंतला दिलेला होता. अर्थात हा शांतपणा वरवर असला तरी आतमध्ये आर. के. चा ग्रुप धुमसत होता. संदिप सांवतने तर जमेल तेव्हा सूड उगवण्याचा निश्चय केला होता. १५ वी मध्ये सि.आर.च काय तर कॉलेजचा यु.आर. होण्या इतपत त्याने तयारी करण्यास सुरुवात केलेली होती.

प्रदिपला १४ वीत गेल्या पासूनच आपल्या मागे साडेसाती लागली की काय असे वाटण्या इतपत परिस्थिती झालेली होती. कुठलाही सण असला की मारामारी होतच रहायची. टि.वाय.बि.कॉमच्या वर्षापासून त्याला त्याचा प्रत्येक दिवस एक-एक महिन्यांसारखा वाटत होता. त्याला कारणही तसेच होते. गेल्या सुमारे १-२ महिन्यात त्याच्या आयुष्यात जाम उलथा-पालथ होत होती. तसाही तो गेले संपूर्ण वर्षभर विविध कारणांनी अस्वस्थ होता. बाकी कटकटी तो सहन करु शकत होता मात्र त्याला भूताटकी असल्यागत कोणीतरी आपला पिच्छा पुरवतय असे वाटत रहायच. आपला कोणीतरी पाठलाग करतोय याची त्याला खात्री पटलेली होती. जुलैच्या पावसात सतत कोणीतरी आपल्याला टेहाळतय अस त्याचे मन त्याला सांगू पाहत होते. मात्र आपल्यामागे नक्की कोण लागले आहे हेच त्याला कळत नव्हते. पाळत ठेवणारा हातात सापडत नव्हता आणि त्याचा उद्देशही त्याला लक्षात येत नव्हता.

कंपनीत तर सर्वजण गणेशोत्सव जोरदार साजरा करायचे. मात्र प्रदिपचे यंदा गणपतीत लक्षच नव्हते. आपल्यावर कोणीतरी आजूबाजूला राहून पाळत ठेवत आहे याची त्याला खात्री पटलेली होती. त्यामुळेच तो प्रत्येक व्यक्तिवर संशयित नजरेने टेहाळणी करत रहायचा. त्याने ही बाब फक्त वड्याला सांगितली होती. आजकाल वड्या त्याचा अतिरिक्त बॉडीगार्डच जसा होता. वड्याला तो वरचेवर पैसेही पुरवत होता. वड्याने त्याला सतर्क राहण्यास सांगितलेले